ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

# बंजारा समाजातील वृद्धांच्या आर्थिक विषयक समस्या

प्रा. दशरथ जाधव,
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

## प्रास्ताविक :

बंजारा या जमातीस भारताच्या वेगवेगळया राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशांत भिन्न भिन्न प्रवर्गात टाकण्यात आलेले आहे. महाराष्ट्रात विमुक्त जाती, आंध्र प्रदेशात अनुसूचित जमाती, कर्नाटकात अनुसूचित जाती इ. ही जमात भारतात सर्वत्र विखुरली गेली आहे. पण आपला सांस्कृतिक ठेवा मात्र आजसुद्धा जपून ठेवण्यात यशस्वी ठरली आहे. प्रत्येक सण – समारंभ वैशिष्टयपूर्ण शैलीत साजरे करण्याची परंपरा या जमातीत दिसून येते.

## आर्थिक समस्या :

बंजारा समाजात पूर्वी संयुक्त पद्धती अस्तित्वात होती आणि त्या कुटुंबाचे सर्व व्यवहार, अधिकार कुटुंबप्रमुख म्हणून वृद्धाकडे होती म्हणून अखेरपर्यंत त्यांना आर्थिक चणचण कधिच भासत नव्हती. बंजारा समुदायात वृद्धांना विशेष असे महत्त्व होते. कोणत्याही आर्थिक व्यवहारासंदर्भात त्यांचे विचार व निर्णय हे मोलाचे ठरत. घरातील सर्व सदस्य एकत्र काम करुन पैसे कुटुंबप्रमुखाकडे देत असत. पैसे ठेवण्यासाठी एक संदूक प्रत्येक घराघरात होती आणि आजसुद्धा दिसते. त्या संदुकीची किल्ली या वृद्ध व्यक्तीकडेच असे. काही खरेदी करावयाची असेल तर वृद्धांना विचारले जात असे.

बंजारा समुदायातील एखाद्या घरात वडींलांकडून मुलांनी आपल्या हाती आर्थिक व्यवहार घेतले असल्यास तर त्यांना समाजाचा रोष पत्करावा लागे, समाजनिंदेला सामोरे जावे लागत असे, म्हणून शेवटपर्यंत आर्थिक व्यवहार फक्त वडीलधारी व्यक्ती करत असे. जरी ते काम करीत तरी. त्यांची सेवा मात्र नित्य होत होती. त्यांना पूजनीय मानले जात असे. म्हणून आर्थिक बाबतीत अडचणच निर्माण झाली नव्हती. एकंदरीत परिवाराप्रति आपुलकीची भावना होती.

पूर्वी बंजारा समुदाय शहरापासून लांब राहत होता, म्हणून शहरी वातावरणापासून अलिप्त होता. आधुनिकीकरणाचे वारे जसजसे तांडयापर्यंत – गावापर्यंत खेडयापर्यंत पोहचू लागले तस – तसा बदल त्यांच्यात होत गेला. त्यामुळे त्यांच्या विचारसरणीत बदल होत गेला. शहराशी संपर्क सतत येत राहिल्यामुळे शहरी संस्कृती आत्मसात करण्याकडे ओढ निर्माण झाली. तो म्हणजे विभक्त कुटुंब पद्धतीचा. केवळ आपल्या पत्नी व मुलांसोबत राहणे अधिक आवडू लागल्यामुळे घरातील वृद्ध आई – बापांकडे दुर्लक्ष केले जावू लागले. ज्यांना पूर्वी पूजनीय, आदर्श व्यक्ती मानत होते, त्यांनाच आज घरातून हददपार केले जात आहे. या वयात काम करता येत नाही, काम करण्याकरिता शरीरात ताकद नसते, तरी वृद्ध आई – वडीलांना आपल्यापासून अलग केले जाते.

अशा वेळेस त्यांच्यासमोर सर्वात मोठा प्रश्न असतो तो म्हणजे आर्थिक, मग रोजंदारी करणे, शेतमजूर म्हणून कामास जाणे, दिवसभर राबणे, काबाडकष्ट करणे हे शेवटी नशिबी उरलेले असतेच. एकाच घरात राहत असतील तरी त्यांना आर्थिक व्यवहारापासून जाणूनबुजून लांब ठेवण्यात येते. त्यांचा कोणत्याच आर्थिक बाबतीत विचार घेतला जात नाही किंवा किती पैसे खर्च झाले व किती जमा आहेत याविषयी माहिती दिली जात नाही. म्हणजे घरात राहूनसुद्धा त्यांना आर्थिक अधिकार नसतो. त्यांच्या हातात पैसे नसल्याने त्यांच्या सुप्त इच्छा ते पूर्ण करु शकत नाहीत. पैशाची मागणी केली म्हणजे अनेक प्रश्नांचा भडीमार सुरु होतो. काय करायचे ? कशाला पाहिजेत ? अशा प्रश्नांना उत्तर देण्याची त्यांची तयारी नसते म्हणून पैसे न मागता आपल्या इच्छांना मुरड घालतात.

दवाखान्याकरिता पैसे खर्च करण्यास तर टाळाटाळ केली जाते आणि सांगितले जाते, की 'काल – परवा तर दवाखान्यात गेला होता आणि पुन्हा आज दवाखाना. दोन तीन दिवस वाट बघुया. औषधांना गुण यायला वेळ लागतो.' इ. प्रकारे त्यांना रोखण्यात येते. आर्थिक व्यवहार हातात नसल्यामुळे त्यांना परावलंबी जीवन जगावे लागते. आजसुद्धा बंजारा समुदायातील वृद्ध व्यक्ती गायी चारतांना दिसतात. शेतात काम करतांना दिसतात. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांची आर्थिक समस्या. या समस्येतूनच आरोग्यविषयक प्रश्न उद्भवतात आणि नंतर कायम पाठीमागे लागतात.

किनवट तालुक्यातील मांडवी परिसरात एका गावातील वृद्ध दांपत्ये शेतातच झोपडी बांधून राहतात. कारण त्यांना इतरत्र निवारा नसल्यामुळे श्रीमंत शेतक–यांच्या शेतमाल रक्षणाकरिता

त्यांना करार पद्धतीने शेतातच जीवन कंठावे लागते. रात्री जंगलात एकटे राहणे, रात्री शेतमालाची नासधूस जंगली जनावरे करतात म्हणून सतत झोपेतून उठून शेतात फिरणे, त्यातून नवनवीन समस्या निर्माण होतात. कधी साप चावणे, विंचू चावणे, कधी – कधी तर जंगली प्राण्यांकडून घायाळ व्हावे लागते. एकूणच त्यांचे जीवन जंगलाच्या चौकटीतच बंदिस्त आहे. अशा प्रकारे अनेक दांपत्ये आपली गुजराण करतांना आढळतात.

बंजारा समुदायातील वृद्ध व्यक्तींच्या आरोग्यविषयक आणि आर्थिक समस्या या इतरांपेक्षा ब–याच प्रमाणात भिन्न आहेत. या समस्यांतून त्यांना मुक्त करायचे असेल तर घरातील सदस्यांनी त्यांच्याकडे प्रेमभावाने बघणे, त्यांच्या छोटया – छोटया अपेक्षा पूर्ण करणे आवश्यक आहे.

**आर्थिक समस्येवर उपाययोजना :**

1. घररातील सदस्यांकडून त्यांना मानाचे स्थान मिळावे, त्यांना आपल्या छोटया मोठया सुखः दुखात सामील करुन घ्यावे, जेणेकरुन त्यांना परावलंबित्व जानवणार नाही.
2. शासनाकडून त्यांच्याकरिता विशेष आर्थिक निधी मिळायला पाहीजे, जेणेकरुन स्वतः च्या इच्छा – अपेक्षा ते पूर्ण करु शकतील.
3. घरातील आर्थिक व्यवहारांत त्यांना सामील करावे, जेणेकडून त्यांची परकेपणाची भावना नष्ट होईल.

**संदर्भ सुची –**

1. श्री. मोहन नाईक – गोरमाटी संस्कृती आणि संकेत.
2. कै. बळीराम पाटील – गोर बंजारे लोकांचा इतिहास
3. डॉ. रुक्मिणी पवार – बंजारा लोकजीवन पध्दती
4. प्रा. मोतीराज राठोड – गोरबंजारा जनजाती एक परिचय
5. श्री. रणजीत नाईक – बुधन
6. देवगावकर एस.जी. – The Banjara
7. डॉ. यशवंत जाधव – बंजारा जाती, समाज और संस्कृति